दिनांक 15/04/2023

## प्रेसनोट

## पो.स्टे.अवधुतवाडी यवतमाळ हद्दीतील चारचाकी वाहन व मोटारसायकल चोरी करणारा आरोपी अटक व पोस्टे अवधुतवाडी हद्दीतील 4 गुन्हे उघडकीस

दि.12/04/2023 रोजी पो.स्टे.अवधुतवाडी यवतमाळ हद्दीतील विविध ठिकाणावरुन 2 चारचाकी वाहन व 2 दुचाकी वाहन असे एकुण 4 वाहन चोरी गेल्याचे समजले वरुन घडलेल्या गंभीर चोरी च्या घटनासंबधाने चोरीचा समांतर तपासाच्या अनुषंगाने गुन्हा उघडकीस येण्याकरीता प्राप्त माहीतीच्या आधारे चोरीच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उप.वि.पो.अ.श्री.संपतराव भोसले यांनी आपले कार्यालयातील अधिनस्त SDPO पथकातील सपोनि/संजय राठोड व त्यांचे पथक यांना गुन्हा उघडकीस आणणेकरीता गुन्ह्या बाबत मार्गदर्शन करुन त्यावरुन SDPO पथकाने आपले गोपनिय बातमीदाराकडुन चोरीच्या गुन्ह्याबाबत माहीती प्राप्त करुन सदर चोरीचे वाहन हे जिल्हा – अमरावती य़ेथे चोरुन नेल्याचे माहीती झालेवरुन पो.स्टे.नागपुरी गेट अमरावती येथील पो.स्टे.प्रभारी मसराम साहेब व पोलीस हवालदार प्रकाश व अकिल खान यांचे माहीती व्दारे गुन्ह्यातील आरोपीतांचा शोध घेतला असता बडनेरा येथील शेख अनिस शेख युनुस याला ताब्यात घेउन त्यास विश्वासात घेउन चोरीच्या गाड्याबाबत विचारणा केली असता त्याने त्याचे ईतर साथीदारां सोबत मिळुन यवतमाळ येथील वाहनांची चोरी केली असल्याचे कबुल केले त्यावरुन पो.नि.मनोज केदारे पो.स्टे.अवधुतवाडी यवतमाळ यांना वाहन चोरी बाबत अवगत करुन त्यांचे अधिनस्त डि.बी पथकातील सपोनि/पवन राठोड व डि.बी.पथकातील कर्मचारी यांचे सोबत मिळुन गुन्ह्यात कसोशीने संयुक्तरित्या तपास करुन पो.स्टे.अवधुतवाडी हद्दीतील चोरी गेलेला गुन्ह्यातील मुद्देमाल 1 टवेरा कार,1 मारुती अल्टो कार,1 हीरो पॅशन प्रो व 1 होन्डा युनिकॉर्न मोटारसायकल असा मुद्देमाल हस्तगत केले चोरी करणे करीता वापरण्यात आलेले 1 दुचाकी वाहन व मोबाईल आरोपी शेख अनिस शेख युनुस याचे कडुन जप्त करुन असा एकुण अवधुतवाडी येथील 4 गुन्हे उघडकीस आणले आहेत व सदर कारवाई दरम्यान एकुण 3,60,000/- रु चा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला

सदरची कारवाई मा.श्री.पवन बन्सोड, पोलीस अधिक्षक साहेब,यवतमाळ. मा.श्री.पियुष जगताप साहेब अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ, मा.श्री.संपतराव भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अवधुतवाडी यवतमाळ येथील पोलीस निरीक्षक श्री.मनोज केदारे, सपोनि/संजय राठोड, सपोनि/पवन राठोड पोहवा/अन्सार बेग, प्रशांत झोड,प्रविण उईके,विकास कमनर, तसेच पो.स्टे.अवधुतवाडी येथील डि.बी.पथकातील पोहवा/गजानन वाटमोडे,सुरेश मेश्राम,आशिष भुसारी,बळीराम शुक्ला,अविनाश ढोणे,धनंजय पोटपल्लीवार,रुपेश ढोबळे,प्रशांत राठोड,बबलु पठाण,चालक सलमान शेख व गणेश राठोड यांनी पार पाडली आहे.